महाराष्ट्र शासन

# उपवनसंरक्षक (प्रादेशिक) भामरागड, वनविभाग स्थित आलापल्ली यांचे कार्यालय

वनसंपदा इमारत चंद्रपुर रोड, आलापल्ली -४४२७०३

दूरध्वानी क्र. ०७१३३-२६६४३२, E-mail ID- dcfbham@gmail.com

स्मरणपत्र-१

विषय :- वनजमीन गडचिरोली
वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत मौजा -ताडगांव येथिल पोलीस मदत केंद्र बांधकामासाठी ता. भामरागड जिल्हा- गडचिरोली येथिल 2.00 हे.वनजमीन वळतीकरण करणेबाबत.

क्रमांक: कक्ष-1/सर्व्हे/वसअ/ 3952
आलापल्ली, दिनांक:- 29/12/2022

प्रति,

मा.पोलीस अधिक्षक,
गडचिरोली

संदर्भ:- 1)वनसंरक्षक (प्रादे) गडचिरोली यांचे कार्या.पत्र क्र. कक्ष-2(8)/जमिन/प्र.क्र.437/3313 दि 02/12/2022
2) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-1/सर्व्हे/वसअ/3795 दिनांक 16/12/2022

***

वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत मौजा - ताडगांव येथिल पोलीस मदत केंद्र बांधकामासाठी क्षेत्र 2.00 हे. वनजमीन वळतीकरण मागणीचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेले आहे. याबाबत वरीष्ठ कार्यालयाकडुन सदर प्रस्तावास 1 ते 2 मुददे उपस्थित करुन त्रुटीची पुर्तता करण्याकरीता वरील सदंर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

करीता संदर्भिय पत्रात मुद्ये 1 आपले विभागाशी संबधित आहेत. करीता उपस्थित करण्यात आलेले मुद्यांचे अनुषंगाने सविस्तर अहवाल आवश्यक दस्ताऐवजासह 5 प्रतित सादर करण्यास संदर्भिय पत्र क्रमांक -2 अन्वये कळविण्यात आलेले आहे परंतू सदर माहिती अप्राप्त आहे. करीता सदरचे पत्र प्राप्त होताच 3 दिवसांचे आत सादर करावे हि विनंती. जेणेकरुन प्रस्तावाचे अनुषंगाने पूढिल आवश्यक कार्यवाही करणे सोईचे होईल.

(नितेश देवगडे.)
उप वनसंरक्षक,
भामरागड वनविभाग, आलापल्ली (अ.का)

प्रतिलिपी :- मा.वनसंरक्षक, (प्रादे.) गडचिरोली याना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सविनय सादर.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
वन विभाग
# वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली यांचे कार्यालय.
वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्रमांक - 07132-233184 फॅक्स क्रमांक & 07132-233187 Email- ccfgad@gmail.com

क्रमांक:-कक्ष-2(8)/जमीन/प्र.क्र.437/2022/3313 गडचिरोली, दिनांक :- 02. 12.2022

विषय:- Forest land Gadchiroli
The Proposal for diversion of 2.00 ha. forest land under section-2 of the Forest (conservation) Act, 1980 for construction of Arm Out Post for Administrative Building etc at Tadgaon, Tal. Bhamragad, Dist. Gadchiroli.

संदर्भ:- 1) महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई, यांचे पत्र क्र.कक्ष एफएलडी-2022/प्र.क्र.256फ-10 दि. 14.10.2022
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपुर यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष 17/नोडल/गड/आयडी-12797/2141/22-23 दि. 23.11.2022

----000----

वन(संवर्धण) अधिनियम 1980 अंतर्गत मौजा ताडगांव, ता. भामरागड जि. गडचिरोली येथे पोलिस स्टेशन उपकेंद्राची प्रशासकिय ईमारत, व इतर बांधकामाकरीता 2.00 हे. वनजमिन वळती करणेबाबत प्रस्ताव केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष 17/नोडल/1264 दि. 19.08.2022 प्रमाणे योग्य मार्गे महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 2 प्रमाणे शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावात 1 व 2 मुद्यांचे अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व आवश्यक दस्ताऐवजांसह माहीती 3 प्रतीत सादर करण्याकरीता या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

तरी, उपवनसंरक्षक(प्रा.), भामरागड यांनी संदर्भिय पत्रात नमुद 1 व 2 मुद्यांचे अनुषंगाने तपासनी करुन आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व आवश्यक दस्ताऐवजांसह माहीती 4 प्रतीत अहवाल या कार्यालयात सादर करावा. आपले अवलोकनार्थ संदर्भिय पत्राची छायांकीत प्रत देण्यात येत आहे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे संदर्भिय पत्र क्र. 1 व 2 ची प्रत.

(डॉ. किशोर एस. मानकर)
वनसंरक्षक, (प्रादेशिक)गडचिरोली

प्रति,
उप वनसंरक्षक (प्रा.),
भामरागड वनविभाग, स्थित आलापल्ली

प्रतिलीपी:- पोलिस अधिक्षक, गडचिरोली यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने उचित कार्यवाहीस अग्रेषित.

उप वनसंरक्षक 5815 7-12-2022

E/Land/D/Police Proposal 2020 /C



Scanned with CamScanner

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारीबी विंग ,पहिला माळा ,
वनभवन००१ ४४० नागपूर ,सिव्हील लाईन्स ,रामगिरी रोड ,
दुरध्वनी क्र२५५६९१६-०७१२ . , ईमेल-: apccfnodal@mahaforest.gov.in


मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे

क्र.कक्ष-१७/नोडल/गडचिरोली/आयडी-१२७९७/२१४१ /२०२२-२३
नागपूर ४४० ००१, दिनांक २३ /११/२०२२

प्रति,
वनसंरक्षक (प्रा.)
गडचिरोली

विषय :- वनजमीन- गडचिरोली
पोलीस ठाण्याची इमारत (Arm Out Post) व पोलिसांसाठी निवासस्थान बांधण्याकरिता मौ.ताडगाव, ता.भामरागड, जि.गडचिरोली येथील २ हे. वनजमीन वळतीकरणेबाबत.

संदर्भ :- शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.२५६/फ-१०, दि.१४/१०/२०२२.

विषयांकीत प्रकरणी संदर्भीय शासन पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या खालील मुद्यांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय सविस्तर माहिती आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आवश्यक दस्तऐवजांसह तीन प्रतीत सादर करावी.

१. मौ.ताडगाव, ता.भामरागड, जि.गडचिरोली येथील स.नं.५६ व कक्ष क्र.५७५ मधील २.०० हे. वनजमीन सशस्त्र पोलीस दूरक्षेत्राच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वळती करण्यास राज्य शासनाने दि.११.०९.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये यापूर्वी मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत प्रस्तावाचे अवलोकन केले असता, त्याच खंडामध्ये Arm Out Post च्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा समावेश केलेला दिसतो. तो प्रस्ताव व संदर्भीय पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव भिन्न आहे किंवा कसे? भिन्न असल्यास एकाच जमिनीवर दोन Arm Out Post उभारणे गरजेचे आहे.

२. पर्यायी वनीकरणासाठी जमीन प्रस्तावित केलेली नाही. पोलीस अधीक्षक यांनी वनेतर जमीन उपलब्ध होत नसल्याबाबत नमूद केले आहे. त्या ठिकाणी वनेतर जमीन उपलब्ध होत नसल्यास, अन्य जिल्ह्यातील जिल्हाधिका-यांच्या मदतीने वनेतर जमीन प्रस्तावित करण्यात यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

23/11/22

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, भामरागड वनविभाग, आल्लापल्ली यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी:- पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
(E-mail address: sp.gadchiroli@mahapolice.gov.in & sdpoofficesironcha@gmail.com)

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०२२/ प्र.क्र.२५६/ फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १४.१०.२०२२

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली
उपवनसंरक्षक,भामरागड

**विषय: वनजमीन-गडचिरोली**
पोलीस ठाण्याची इमारत (Arm Out Post) व पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याकरिता मौ. ताडगाव, ता.भामरागड, जि. गडचिरोली येथील २ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी याचे पत्र क्र. Desk-१७/२/Nodal/ID-१२७९७/१२६४/२०२२-२३,दि.१९.०८.२०२२

पोलीस ठाण्याची इमारत (Arm Out Post) व पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याकरिता मौ. ताडगाव, ता.भामरागड, जि. गडचिरोली येथील कक्ष क्र. ५७५, स. नं. ५६ मधील २ हे. वनजमीन वळती करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील माहिती / कागदपत्रे शासनास सादर करावीत:-

१. मौ.ताडगाव, ता.भामरागड, जि.गडचिरोली येथील स. नं. ५६ व कक्ष क्र. ५७५ मधील २.०० हे. वनजमीन सशस्त्र पोलीस दूरक्षेत्राच्यां प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वळती करण्यास राज्य शासनाने दि.१९.०९.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये यापूर्वी मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत प्रस्तावाचे अवलोकन केले असता, त्याच खंडामध्ये Arm Out Post च्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा समावेश केलेला दिसतो. तो प्रस्ताव व संदर्भीय पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव भिन्न आहे किंवा कसे? भिन्न असल्यास एकाच जमिनीवर दोन Arm Out Post उभारणे गरजेचे आहे काय?

२. पर्यायी वनीकरणासाठी जमीन प्रस्तावित केलेली नाही. पोलीस अधीक्षक यांनी वनेतर जमीन उपलब्ध होत नसल्याबाबत नमूद केले आहे. त्या ठिकाणी वनेतर जमीन उपलब्ध होत नसल्यास, अन्य जिल्ह्यांतील जिल्हाधिका-यांच्या मदतीने वनेतर जमीन प्रस्तावित करण्यात यावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी: पोलीस अधीक्षक, गडचिरोली

Scanned with CamScanner